ओएनजीसी (डब्ल्यु.ओ.यु.) कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस तथा ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समितीचे सरचिटणीस मा. प्रदीप भाई मयेकर साहेब व वरिष्ठ पदाधिकारी यांची न्हावा सप्लाय बेस भेट

शुक्रवार, दिनांक १८.०७.२०२५











ओएनजीसी (डब्ल्यु.ओ.यु.) कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस तथा ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समितीचे सरचिटणीस आदरणीय श्री. प्रदीप भाई मयेकर साहेब यांनी शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी मुंबई ऑफशोर व न्हावा सप्लाय बेस येथील कामगारांच्या काही महत्वाच्या समस्यांसाठी न्हावा सप्लाय बेस येथे भेट दिली. त्यांच्या सोबत ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समितीचे कार्याध्यक्ष मा. श्री संदीप गावडे व कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष मा. श्री नवनाथ टेमकर हे सुद्धा उपस्थित होते. मा. प्रदीप भाई मयेकर साहेबांनी न्हावा सप्लाय बेस स्थित

कर्मचारी संघटनेच्या तथा जनरल कामगार संघटनेच्या मोठ्या संख्येनी उपस्थित कामगारांसोबत प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना सोबत घेत न्हावा सप्लाय बेस प्रमुख श्री. पंकज मंडल सर, GGM ( Logistics ) व HR/ER इन्चार्ज श्री. झिणे साहेब, GM ( HR) यांची भेट घेत यांच्यासोबत मुंबई ऑफशोर मधिल कामगारांना भेडसवणाऱ्या महत्वाच्या समस्यांबाबत व न्हावा सप्लाय बेसवरील काही विषयांवर विस्तृतपणे चर्चा केली. ज्यामध्ये प्रामुख्याने चर्चा झालेले मुद्दे खालीलप्रमाणे.

१) मुंबई ऑफशोर स्थित वेगवेगळ्या रीग व प्लॅटफॉर्म वर फूडबॉक्स उशिरा पोचत असल्या संदर्भात :-

निष्कर्ष :- न्हावा सप्लाय बेस यांनी सांगितल्या प्रमाणे गेल्या महिना - दीड महिन्यात पावसाळी वातावरण खुप खराब असल्यामुळे फूड बॉक्स बोटी इच्छित स्थळी वेळेवर पोहोचण्यास अडचणी येत होत्या. पण सध्या पाच बोटी फूड बॉक्स डिलिव्हरी साठी दिलेल्या आहेत व त्यामुळे फूड बॉक्स वेळेवर पोहोचत आहेत.

२) MH Asst व B & S Asst मधील वेगवेगळ्या ठिकाणच्या नवीन फर्निचरच्या डिलिव्हरी बाबत.

निष्कर्ष :- MH Asst मधिल अनेक प्लॅटफॉर्म वर नवीन फर्निचर पोच झालेले आहे. B & S Asst मधील प्लॅटफॉर्म वर फर्निचर पाठवण्यासाठी रिकामे कंटेनर उपलब्ध करून देण्यात येतील व त्यानुसार लवकरच तेथील फर्निचर डिलिव्हर होईल.

३) न्हावा सप्लाय बेस येथे मेडिकल बिल साठी TPA Desk नसल्याने न्हावा येथील अधिकारी व कामगारांना आपली मेडिकल बिले पनवेल येथे घेऊन जावी लागत आहेत.

निष्कर्ष :- इन्चार्ज HR / ER सोबत झालेल्या चर्चेत आठवड्यातुन एकदा TPA चा प्रतिनिधी न्हावा सप्लाय बेस येथे येण्यासाठी मागणी करण्यात आली. त्यास HR / ER कडून अनुकूल प्रतिसाद मिळाला आहे.

४) न्हावा येथील कर्मचाऱ्यांना फॅक्टरी ऍक्ट प्रमाणे ओव्हर टाईम मिळावा या साठी कर्मचारी संघटने कडून केलेल्या सखोल पत्रव्यवहारा नंतरच्या स्थिती बाबत

निष्कर्ष :- न्हावा येथे नव्याने रुजू झालेल्या इन्चार्ज HR / ER यांनी आपल्या कडून केलेल्या पत्रव्यवहाराची पूर्ण माहिती घेऊन त्यानुसार दिशा फाईल नंबर प्रमाणे त्याचे सध्याची स्थिती काय आहे हे लगेचच तपासून आपल्याला माहिती देण्याचे आश्वासीत केले आहे.

५) न्हावा सप्लाय बेस येथे फिल्ड मध्ये कार्यरत महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महिला प्रसाधनगृह बांधण्याबाबत

निष्कर्ष :- इन्चार्ज HR / ER यांनी या गंभीर समस्येबाबत स्वतः लक्ष देऊन ही समस्या सोडविण्यासाठी सिव्हिल सेक्शन सोबत चर्चा करण्याचे आश्वासन दिले.

६) न्हावा सप्लाय बेस येथील दुरावस्था झालेल्या कॅन्टीन च्या नूतनीकरणा बाबत.

निष्कर्ष :- इन्चार्ज HR / ER यांच्या माहिती नुसार सिव्हिल सेक्शन तर्फे कॅन्टीन नूतनी करणाचे कॉन्ट्रॅक्ट मे. पॉवर मेक या कंपनीला दिलेले असून येत्या सोमवारी कंत्राटदारा कडुन होत असलेल्या विलंबाबाबत त्याला विचारणा करण्यात येईल.

७) या वरील महत्वाच्या विषयांसोबत न्हावा येथील अंतर्गत ट्रॅफिक चा प्रश्न, अपोलो फार्मसीकडुन कामगारांना उशिरा होणारा औषधं पुरवठा,१४ दिवस ऑन / ऑफ ड्युटी पॅटर्न वरील रेसिडेंट डॉक्टर, यासोबत न्हावा सप्लाय बेस येथे काम करत असलेल्या कंत्राटी कामगारांच्या अनेक समस्या व प्रश्नांबाबत ओएनजीसी न्हावा,प्रशासनासोबत सखोल चर्चा केली व त्या सोडवण्याच्या दृष्टीने योग्य त्या योजना सुचविल्या.

७) सरचिटणीस मा. प्रदीप भाई मयेकर साहेब यांनी त्यांच्या मागील न्हावा भेटी नंतर पूरक पत्रव्यवहार केल्यामुळे व सततच्या झालेल्या पाठपूराव्यामुळे न्हावा सप्लाय बेस मधिल सर्व शेडचे झालेले नूतनीकरण,नव्याने लागलेले इलेक्ट्रिक पॅनल, वेब्रिज मधील कंत्राटी कामगारांची वेतन वाढ व सोबत अनेक प्रश्न मार्गी लागल्याने मा. प्रदीप भाई मयेकर साहेबांनी न्हावा युनिट मधील कर्मचारी संघटनेच्या तथा जनरल कामगार संघटनेच्या पदाधिकारी व सर्व सभासदांचे अभिनंदन केले.

ओ एन जी सी (डब्ल्यु.ओ.यु.) कर्मचारी संघटना

ओएनजीसी (डब्ल्यु.ओ.यु.) जनरल कामगार संघटना

न्हावा सप्लाय बेस